भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया या वसतीगृहाच्या नविन इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीएच-२०१९/प्र.क्र.०५/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ३१ जुलै, २०१९

संदर्भ :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सान्यावि-२०१५/प्र.क्र.१६३/ बांधकामे, दि.०९.१०.२०१५.
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१५/प्र.क्र.४११/ बांधकामे, दि.१६.१२.२०१५.
३) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/बांधकामे/अर्जुनी मोरगाव मुलींचे/अंदाजपत्रक/२०१८-१९/९५, दिनांक ०९.०१.२०१९.

प्रस्तावना :-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्ताने राज्यामध्ये मागासवर्गीय मुलींना शिक्षण घेणे सोयीचे व्हावे, म्हणून मुलींसाठी विभागीय स्तरावर ७ आणि जिल्हा व तालुका स्तरावर ४३ अशी एकूण ५० ठिकाणी नविन वसतिगृह शासकीय वसतिगृहे सुरु करण्यास संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन मान्यतेच्या अनुषंगाने संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती विर्षानिमित्त १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया या नविन शासकीय वसतिगृहाच्या इमारत बांधकामाचा रु.१३,३४,६४,८२२/- (अक्षरी रुपये तेरा कोटी चौतीस लक्ष चौसष्ठ हजार आठशे बावीस फक्त) इतक्या रकमेचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यते करीता सादर केला आहे. सदरहु प्रस्ताव तांत्रिक छाननीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविला असता सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर प्रस्तावास रु.११,०३,८३,८३७/- (अक्षरी रुपये अकरा कोटी तीन लक्ष त्र्याऐंशी हजार आठशे सदतीस फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शविली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केलेल्या रु.११,०३,८३,८३७/- (अक्षरी रुपये अकरा कोटी तीन लक्ष त्र्याऐंशी हजार आठशे सदतीस फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केलेल्या रु.११,०३,८३,८३७/-

(अक्षरी रुपये अकरा कोटी तीन लक्ष त्र्याऐंशी हजार आठशे सदतीस फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

अ) बांधकाम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सूरु करावे.

ब) ढोबळ स्वरुपात करण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक तयार करुनच काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१ दि.१०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

इ) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

ई) तांत्रिक मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रकावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे साक्षांकन आवश्यक आहे.

उ) उपरोक्त बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाव्दारे करण्यात यावे.

२. सदर मागासवर्गीय मुलींच्या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करुन, विहित नियमानुसार अटी व शर्ती निश्चित करुन ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ करावी. ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ई-निविदा प्रक्रियेची सर्व कागदपत्रे सामाजिक न्याय विभागाकडे (उपभोक्ता विभाग) दायित्व मंजूरीसाठी पाठविण्यात यावीत. सामाजिक न्याय विभागाची अंतिम मान्यता झाल्यानंतरच बांधकामाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती विर्षानिमित्त १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकाचा सर्वसाधारण गोषवारा पुढील प्रमाणे आहे :-

GENERAL ABSTRACT FOR BACKWORD CLASS 100 GIRLS GOVERNMENT HOSTEL, ARJUNI MORGAON, DIST.GONDIA

Name of the Department : SOCIAL JUSTICE DEPTT.					
Name of Work : Construction of Govt.Hostel of Backward Class Girls students at Arjuni Morgaon (Capacity - 100 students Distt. GONDIA					
RECAPITULATION SHEET					
Sr. no.	**Particulars of Items**	**Norms (units Rate Rs.per Sqmt. Meter/lumpSum etc.)**			**Cost Rs.**
(A)	**ESSENTIAL ITEMS**				
1	**Building proper (Scope)**				
	(a) Area	**2466.46**	**24500**	**per Sqmt**	6,04,28,270

	(b) Number of Floors	**GF+1**			
	(d)Cost of Constuction		**(d)**		**6,04,28,270**
2	**Electrification**	Internal	5% of 1(d)		30,21,414
		External	6% of 1(d)		36,25,696
				Total	**66,47,110**
3	**Water Supply and Sanitaion**		5% - of 1(d)		**30,21,414**
4	**Miscellaneous Items**				
	Compound Wall	450	8000		36,00,000
	Internal Roads	350	14804		51,81,400
	CC Drain	1	327600		3,27,600
	Fire Fighting Arrangements		Lump Sump		5,00,000
	Land Development		Lump Sump		2,00,000
	Rain Water harvesting		Lump Sump		5,00,000
	MSDCL Tranceformer etc		Lump Sump		5,00,000
	CD Work 800 mm Dia	4	324000		12,96,000
	Furniture	1726	3000		51,78,000
	Soil Investigation		Lump Sump		1,00,000
	Guard Room		Lump Sump		5,00,000
	Generator/External Light		Lump Sump		5,00,000
	Parking		Lump Sump		2,00,000
				Total	**1,85,83,000**
		Sub Total (A) = (1)+(2)+(3)+(4)			**8,86,79,793**
(B)	**OPTIONAL ITEMS**				
Sr.	**Items**				
	Flag post/ramp				50,000
	Water Main, Storage & Pump House			Lump sum	10,00,000
	Solar Energy System			Lump Sum	10,00,000
	Subtotal (B)				**20,50,000**
	PROJECT (A) + (B)			**(T)**	**9,07,29,793**
	Add 4% for Contingencies on (d)				**24,17,131**
	Add 3% for Green Building Concept on (d)				**18,12,848**
	Add 12% for GST on (T)				**1,08,87,575**
	Add 5% for Price Escalation on (T)				**45,36,490**
	TOTAL COST OF PROJECT				**11,03,83,837**
				Say Rs. Lakhs	**1,103.84**

४. या वर होणारा खर्च मागणी क्र. एन-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, ७८९-अनुसूचित जाती घटक योजना, ०२-भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे, (योजनांतर्गत-दत्तमत) लेखाशीर्ष-२२२५ डी-८२३ या लेखाशीर्शाखाली खर्ची घालून तो सन २०१९-२० या वित्तीय वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा. तसेच आहरण व संवितरण अधिकारी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, गोंदिया यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०७३१११४२११२८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.07.31 11:47:15 +05'30'

(अ. कों. आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे/नागपूर.
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कार्यकारी.
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, गोंदिया.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया.
१०) निवडनस्ती.